# प्रेस नोट दि-२२/०९/२०१७

दिनांकः-०६/०९/२०१७ रोजी रात्रौ २२.३० ते. दि-०७/०९/२०१७ रोजी सकाळी ०९.३० वा.चे दरम्यान फिर्यादी श्री नंदकुमार टी.पी वय-३८ रा नवनाथ संकुल, फ्लॅट नं-८, गोकुळ नगर, धानोरी पुणे यांची पार्कींग जागेत पार्क केलेली होंडा युनिकोर्न मोटार सायकल नं-एम.एच.१२-एचएक्स-६२३३ हि अज्ञात चोरट्याने चोरुन नेलेने विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं-३३०/१७ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये धानोरी रोड,विश्रांतवाडी चौक, व गोल्फ क्लब चौक येथील सीसीटिव्ही कॅमे-याचे फुटेज पोलीस उपनिरीक्षक विशाल मोहिते, पो.शि अशोक शेलार व प्रितम जंगम यांनी प्राप्त करुन त्या अनुषंगाने तपास करुन आरोपी नामे- अभिजीत वसंत ससाणे वय-२५ रा यशवंत नगर, येरवडा पुणे यास निष्पन्न केला.पो.शि प्रफुल्ल मोरे,सुभाष आव्हाड, प्रितम जंगम यांनी सदर आरोपीचा शोध घेवुन त्यास गोल्फ क्लब रोड येरवडा पुणे येथुन ताब्यात घेतले. त्याचवेळी विश्रांतवाडी व येरवडा पो.स्टे.चे रेकॉर्डवरील महिन्यापुर्वी जेलमधुन सुटलेला आरोपी नामे-प्रशांत उर्फ सोन्या सुरेश सावंत वय-२६ रा.साळवे वस्ती, गिरणी समोर, खेसे पार्क, लोहगाव पुणे यास ताब्यात घेवुन दि-११/०९/२०१७ रोजी अटक केली.

आरोपीकडे तपास करुन त्यांचेकडून विश्रांतवाडी पो.स्टे.कडील १ होंडा युनिकॉर्न, हिरो होंडा पॅशन, होंडा ग्लॅमर मोटार सायकल व एक सुझुकी ॲक्सिस अशा एकुण किं.रु.१,३०,०००/-रु.च्या ४ दु चाकी गाड्या व किं.रु.३०,०००/-रु.चे दोन ॲनरॉईड मोबाईल असा एकुण किं.रु.१,६०,०००/-चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

मा.श्री दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त सो परि-४ पुणे, श्री वसंत तांबे, सहा.पो.आयुक्त सो खडकी विभाग पुणे, श्रीमती संगीता पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री दिलीप शिंदे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल मोहिते,कर्मचारी उत्तम कदम,सुनिल खंडागळे,सुभाष आव्हाड,अशोक शेलार,प्रफुल्ल मोरे, प्रितम जंगम,प्रविण भालचिम,विनायक मुधोळकर,किशोर दुर्गीग व विनायक रामाणे यांनी कामगीरी केली.